# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय

## दरमहा मानधनावर हंगामी स्वरुपात (३ वर्षे कालावधीकरीता) पद भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नवीन पदव्युत्तर संस्था सुरु करणेबाबत प्रस्तावित आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे एक पद ३ वर्षे कालावधीकरीता भरावयाचे आहे. त्याची अर्हता, अनुभव, पदसंख्या व अटी यांचा तपशील पुढीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता / अनुभव / इतर |
|---|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता | ०१ (अनारक्षित) | खुल्या प्रवर्गाकरीता ५० वर्षे<br>मागास प्रवर्गाकरीता ५५ वर्षे | १. वैद्यकिय विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी<br>२. प्राध्यापक व सह प्राध्यापक पदावरील १० वर्षाचा अनुभव त्यापैकी ५ वर्ष प्राध्यापक पदाचा अनुभव असणे आवश्यक |

अटी व शर्ती -

१. उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केलेल्या वयोमर्यादेमध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास वयाची अट शिथील करुन पद भरण्यात येईल. शासनाच्या वयाची अट केंद्रीय वैद्यक परिषदेच्या नियमानुसार राहिल.

२. भारतीय वैद्यक परिषदेने निर्धारित केलेली वैद्यकिय संस्थांतील अध्यापकांसाठीची किमान अर्हता १९९८ ( मे २०१५ पर्यंतच्या सुधारणांसहीत) चे इच्छुक उमेदवारांनी अवलोकन करावे.

३. मुलाखतीस येण्याजाण्याकरीता उमेदवारांस कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय राहणार नाही.

४. सदर जाहिरातीनुसार मानधनावर निवड होणाऱ्या उमेदवारांना भविष्यात, पदव्युत्तर संस्थेकरीता स्थायी स्वरुपात भरावयाच्या अधिष्ठाता या पदाकरीता प्राधान्य देणेत येईल.

५. अर्जासोबत सादर करणेत आलेली कागदपत्रे चुकीची अथवा खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास, उमेदवारी ग्राह्य धरली जाणार नाही.

६. सदरचे पदाकरीता र.रु. ३७४००-६७००० अँके.ग्रेड पे १०००० इतके वेतनश्रेणीनुसार वेतन भत्ते अथवा एकत्रित मानधन १,५०,०००/- अदा करणेत येतील. ( भा.आ.प.च्या नियमानुसार देय असलेल्या सुविधा वगळता ) महापालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांना लागू असणाऱ्या कोणत्याही सुविधा मानधन कालावधीत कार्यरत असताना लागू राहणार नाहीत अथवा देय राहणार नाहीत.

७. महापालिका सेवेतील कामकाजाची वेळ स. ९.०० ते सायं. ५.०० अशी राहिल. तसेच रुग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहिल, त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

८. उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका, प्रमाणपत्रे, फोटो इ. सादर करणे बंधनकारक आहे.

९. निवड झालेल्या उमेदवारास महापालिकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. यामध्ये कसुर केल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०. वरीलप्रमाणे नमुद केलेली नेमणुक ही हंगामी स्वरुपाची आहे.त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा अधिकार प्राप्त राहणार नाही.

११. ज्या दिवशी महापालिकेस सदर पदाच्या सेवेची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय सेवा संपुष्टात आणणेत येईल.

१२. वेबसाईटवरील जाहिरातीसमवेत असलेल्या विहित नमुन्यातील अर्जामध्ये माहिती भरण्यात येऊन ते आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह मुलाखतीचे वेळी सादर करणेत यावे.

Scanned by CamScanner

१३. उमेदवारास नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक (थंब इम्प्रेशन) पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहिल व हजेरी पुस्तकावर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक राहिल. त्याशिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

१४. निवड झालेल्या उमेदवाराची निवड यादी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.pcmcindia.gov.in) प्रसिध्द करणेत येईल. याबाबत स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करणेत येणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदाकरीता दि.३०/०८/२०१७ रोजी सकाळी १०.३० वा. वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय, दुसरा मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११०१८ येथे आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ व साक्षांकित केलेल्या प्रतींसह समक्ष उपस्थित रहावे. उपस्थित राहणा-या उमेदवारांना आवश्यक त्या सुचना मुलाखतीचे वेळी देण्यात येतील. सदर दिवशी उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरचे पद दर सोमवारी होणाऱ्या walk in interview द्वारे भरणेत येईल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

जाहीरात क्र- ७०४
रोटेशन क्र- १ ब
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/०८/कावि/९०४/२०१७
दिनांक १८/०८/२०१७.

Scanned by CamScanner

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

PIMPRI, PUNE 411018

PHOTO

To,
Hon.Commissioner,
PimpriChinchwad Municipal Corporation
Pimpri, Pune 411018

**Subject - Application for the post of DEAN**
**Reference - Advertisedt.**

1. **Name -** ______________________
2. **Postal Address –**

______________________

______________________

3. **Date of Birth** | | | | | | | | |
4. **E-mail ID -** ______________________
5. **Caste -** ______________________
6. **Category -**

| SC | ST | VJNT | OBC | SBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

7. **Educational Qualification**

| | |
|---|---|
| Graduation | |
| Post Graduation | |
| Any Other Qualification | |

8. **Experience**

| | Name of the Institute | Years |
|---|---|---|
| As a Associate Professor | | |
| As a Professor | | |
| As a Dean | | |

9. **Research Publications**

| | Topic | Year |
|---|---|---|
| International | | |
| National | | |
| Regional | | |



.. 2 ..

10. **Publication of Books**

| | Name of the Institute / Details | Year |
|---|---|---|
| Text Book | | |
| Ref. Book | | |
| University Approved Book | | |

C:\Documents and Settings\CHANAKYA4\Desktop\Dean_Advt.docx

Scanned by CamScanner

11. **Participation in Coferences**

| | Details | Year |
|---|---|---|
| International | | |
| National | | |

12. **If candidate have any other information please attach separate paper with this application.**

**Above given information is trueand accurate. If in future, information willnotice false, the candidate may have eligible to terminate immediately from the service.**

**Name & Signature**

Scanned by CamScanner